# प्रात्यक्षिक क्रमांक –०७

## वस्त्रांवरील लेबलचा संग्रह करणे व ओळखणे

## माहितीपर, कायमस्वरूपी, खबरदारी ब्रॅन्ड व प्रशस्तीपर लेबल

विद्यार्थीनींनी वर उल्लेख केलेले लेबलचे नमुने गोळा करावेत व प्रात्यक्षिक वहीत चिकटवावेत.

विद्यार्थीनींनी प्रत्येक लेबलचे निरीक्षण करावे.

विद्यार्थीनींनी लेबलच्या वैशिष्ट्यांचा बारकाईने अभ्यास करावा.

**अ) माहितीपर लेबल**

कापडावरील माहितीपर लेबलवर पुढील माहिती दिलेली असते.

१) उत्पादकाचे नाव
२) उत्पादकाचे बोधचिन्ह (लोगो)
३) कापडाचे व्यापारी नाव
४) घटक तंतू
५) धागे
६) कापडाची रचना / काऊंट
७) संस्करण प्रक्रिया
८) बॅच क्रमांक / तारीख
९) लांबी व रूंदी
१०) किंमत प्रति मीटर

**ब) कायमस्वरूपी खबरदारी लेबल :** ही लेबल लेखी स्वरूपात असतात किंवा चिन्हांच्या स्वरूपात असतात. धुलाई, वाळविणे, इस्त्री करणे, निर्जल धुलाई, विरंजन इ. संदर्भातील माहिती या लेबलवर आढळते.

**क) ब्रॅन्ड लेबल :** लेबल म्हणजे विशिष्ट डिझाईन किंवा प्रतीक. खास काही वेळा डिझाईन बरोबर शब्दांचा वापर असतो. उदा. व्यापारी चिन्हे (Trade mark) व व्यापारी नावे (Trade name)

**ड) प्रशस्तीपर लेबल :** वस्त्रांवरील हे लेबल त्या वस्त्रांच्या उच्च दर्जाची खात्री देते. उदा. सिल्क मार्क, वूलमार्क, हॅन्डलूम मार्क व या सारखी अन्य प्रशस्तीपर लेबल.

❊ ❊ ❊